# प्रकरण - दोन

## मूल्य अर्थ, महत्व आणि त्याचे अध्यापन

# प्रकरण २ रे

## मूल्य - अर्थ, महत्व आणि त्यांचे अध्यापन

२.१ प्रस्तावना

२.२ मूल्य - अर्थ आणि महत्व

२.३ मूल्यांचे अध्यापन

२.४ समारोप

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रकरण २ रे

## मूल्य - अर्थ, महत्व आणि त्याचे अध्यापन

### २.१ प्रस्तावना :

व्यक्तीवर विविध घटकांकडून संस्कार होत असतात. त्यातील कांही जाणीवपूर्वक केले जातात, तर कांही आपोआप होतात. शिक्षक अध्यापनाद्वारे हे संस्कार बालकावर जाणीवपूर्वक करत असतो. या संस्कारांमध्ये मूल्यांना महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे व्यक्तीवर जे संस्कार केले जातात ते मूल्यांना अनुसरुन केले जातात. म्हणून शिक्षकास मूल्य म्हणजे नेमके काय ? माहित असणे आवश्यक आहे. तसेच या मूल्यांचा संस्कार कां करावयाचा म्हणजेच संबंधित मूल्यांचे व्यक्तीच्या जीवनात कोणते स्थान आहे ? त्याचे कोणते महत्व आहे ? हे माहित असणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणामध्ये मूल्यांचा नेमका अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच अशा मूल्यांचे व्यक्तीच्या जीवनात कोणते महत्वाचे स्थान आहे तेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच बरोबर ही मूल्ये रुजवावयाची म्हणजे नेमके काय करावयाचे हेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही मूल्ये रुजवण्याचे कार्य शिक्षक आपल्या अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये करत असतो. म्हणजेच शिक्षक अध्यापनाद्वारे ही मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित करत असतात. त्यामुळे मूल्य शिक्षणाच्या संदर्भात अध्यापन कसे केले पाहिजे, मूल्य शिक्षणाच्या अध्यापन पध्दती कोणत्या आहेत ? तेही स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

थोडक्यात सदर प्रकरणामध्ये मूल्य म्हणजे काय ? त्याचे मानवी जीवनातील महत्व, मानवी जीवनावर प्रभाव टाकणारी विविध मूल्ये, त्या मूल्यांचे अध्यापन कसे करावयाचे याचा उहापोह केलेला आहे.

## २·२ मूल्य - अर्थ आणि महत्व :

अर्थशास्त्रामध्ये मूल्य ही संज्ञा वस्तूचा बाजार दर, किंमत या अर्थाने वापरण्यात येते. साहित्यशास्त्रात " मूल्य " हा शब्द समाजकल्याण अथवा मानवाचे हित या अर्थापर्यंतचा मर्यादित नाही, त्याचा यापेक्षा अधिक व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. म्हणजेच मूल्या या शब्दामध्ये मानवाखेरीज इतर जी जीवसृष्टी आहे, याहीपेक्षा पुढे म्हणजे निसर्गातील सर्व घटकांचे हित, कल्याण हा अर्थ "मूल्य" या शब्दामध्ये अभिप्रेत आहे.

मानव हा आयुष्यामध्ये अनुभवाची किंवा पदार्थाची निवड करत असतो. ती म्हणजे चांगले अथवा वाईट; सुष्ट अथवा दुष्ट, प्रिय अथवा अप्रिय, म्हणजे हे अनुभव अथवा पदार्थाची व्यक्तीची ही निवड चांगल्या अथवा वाईट या निकषावर होते. अनुभवाचा अथवा पदार्थाचा चांगला वाईटपणा म्हणजेच त्याचे मूल्य होय.[१] यावरुन मूल्य हे प्राप्तव्य असते, साध्य असते. वस्तुस्थिती कशी असावी आणि कशी नसावी हाही एक दुसरा अंश यात आहे. आहे आणि असावयास हवे यातील हा फरक म्हणजे तथ्य (Fact) व मूल्य यातील फरक होय. या अर्थाशी संबंधित असा मूल्य याचा आणखी एक अर्थ होतो. "मूल्य म्हणजे पदार्थाची आस्वादात्मक आस्वाद्यमानता, रसवत्ता अथवा रमणियता होय."[२] उदा. या फुलाला अमुक इतक्या पाकळ्या आहेत. त्याचे वजन इतके आहे. त्याची रंगछटा अमूक आहे... अशा त-हेची आणखी विधाने करुन त्या फुलाच्या संपूर्ण तथ्यांचे निवेदन करता येईल. पण या यथातथ्य निवेदनानंतर त्या फुलाचे मूल्य अथवा आस्वाद्यमानता ही गोष्ट निराळीच राहते. मूल्य हे प्राप्तव्य आहे कारण ते आस्वाद्य आहे. उष्णतामान हे ज्या प्रमाणे उष्णता व शीतता या दोहोंचे मापन असते त्याप्रमाणे मूल्यानुभवात शुभतेचा व अशुभतेचा, धनमूल्यांचा व ऋण मूल्यांचा समावेश होतो.

आपल्या तथ्य अनुभवातून भौतिक, रसायन यासारखी वर्णनात्मक शास्त्रे निर्माण होतात. नीती, धर्म, कला, राज्यशासन इत्यादी जीवनाच्या दालनातून मूल्यानुभवाचे संघटन होते. त्या त्या संघटित मूल्यानुभवाची नीतिशास्त्र, राज्यशास्त्र

इत्यादी स्वतंत्र शास्त्रे आहेत. ती आदर्शात्मक शास्त्रे होत. सर्व आदर्शात्मक शास्त्रांच्या मुळाशी असलेली जी मूल्य संकल्पना तिचा व्यापकपणे विचार करणारे विशेष शास्त्र म्हणजे मूल्यशास्त्र होय.

माणसाचे वर्तन कसे असावे या संबंधी समाजाने कांही आदर्श निर्माण केलेले असतात. हे आदर्श म्हणजेच मूल्य होय.

मूल्य शब्दाने मनोधारणेची विशिष्ट स्थिती वा घडण दर्शविली जाते. मनाच्या या विशिष्ट घडणीवरच व्यक्तीचे समाजातील वर्तन अवलंबून असते. इतरांशी सद्भावनेने वागण्यास व्यक्तीला ज्या वृत्तींची मदत होते ते नैतिक मूल्य होय.[3] तसेच ज्या मनोधारणेच्या विशिष्ट स्थितीमुळे किंवा घडणीमुळे अथवा वृत्तीमुळे आपले इतरांच्या बाबतीत जे प्रत्यक्ष वर्तन घडते त्याला नैतिक गुण म्हणतात. नैतिक गुण म्हणजेच मूल्यांचे प्रत्यक्ष व्यवहारातील प्रकटीकरण होय. सामाजिक हित साधण्यासाठी स्वतःच्या इच्छा व प्रवृत्ती यावर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या गुणांमुळे मिळते ते नैतिक गुण होत. उदा. सत्य हे मूल्य आहे पण आपण जेंव्हा राम सत्यवचनी होता असे म्हणतो तेंव्हा आपल्याला असे म्हणावयाचे असते की, त्याच्या मनाची घडणच सत्य बोलण्याची होती.

सत्य हे मूल्य झाले पण सत्यवचनी हा नैतिक गुण झाला. आदर, आतिथ्य ही मूल्ये झाली. परंतु आदरपूर्ण वागणे अथवा आतिथ्य करणे हा गुण झाला. हे गुण व्यक्तीमध्ये जन्मजात नसतात. हे उघड आहे. म्हणून व्यक्ती गुण संपन्न होण्यासाठी हे गुण शिकायला हवेत, परंतु मूल्ये केवळ बौध्दिक स्तरावर शिकवून चालणार नाहीत. तर त्या मूल्यांचा बौध्दिक, भावनिक व क्रियात्मक स्तरावर स्विकार केला गेला पाहिजे. त्यामुळे मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकाची जबाबदारी वाढते. कारण शिक्षणाद्वारेच आपण व्यक्तीला गुणसंपन्न बनवू शकतो.

एन.सी.ई.आर.टी. ने प्रसिध्द केलेल्या " व्हॅल्यूज अॅन्ड स्कूल " या पुस्तकात मूल्य या संज्ञेची पुढील प्रमाणे व्याख्या केलेली आहे.

" A Value is what is desired or what is sought, values may be operationally conceived as those guiding principles of life which are conducive to one's physical and mental health as well as to social welfare and adjustment and which are in tune with one's culture".[4]

ज्याची आकांक्षा धरावी अथवा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य. परंपरेला धरून एखाद्याच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला तसेच समाजहिताला आणि समायोजनाला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्वे म्हणजे मूल्ये होय, अशी मूल्यांची व्यावहारिक व्याख्या करता येईल. जीवन व मूल्ये यांचा घनिष्ठ संबंध आहे हे आपल्या लक्षात येईल. कारण जीवनास अर्थपूर्णता यावयाची असेल तर जीवनमूल्यांचा स्वीकार व्यक्ती जीवनात होणे अगत्याचे आहे.

तत्वज्ञानावर आधारित अशा जीवनविषयक दृष्टिकोनाची, आदर्शांची व ध्येयांची अभिव्यक्ती ज्यातून होते त्यांनाच आपण जीवनमूल्ये म्हणतो. प्लेटोने आदर्शवादात हा विचार मांडला. सत्य , शिव व सौंदर्य ही त्यांच्या मते जीवनाची अंतीम मूल्ये. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून ज्ञानात्मक अनुभव म्हणजे सत्य, क्रियात्मक अनुभव म्हणजे शिव किंवा सद्वर्तन वा चारित्र्य होय. व भावात्मक अनुभव म्हणजे सौंदर्यानुभूती होय. अध्यात्मवादात हीच कल्पना सत्, चित् व आनंद या मूल्यांतून मांडलेली आहे. या मूल्यांचा व्यापक अर्थ स्वीकारल्यास त्यात मानवी विकासाला आवश्यक अशा सर्व घटकांचा व गुणांचा अंतर्भाव होतो असे दिसून येईल. तेंव्हा या मूल्यांचे संस्कार करणे हे शिक्षणाचे महत्वाचे कार्य ठरते.

सामाजिक मूल्ये ही संकल्पना फारच व्यापक व सापेक्ष स्वरुपाची आहे. सामाजिक दृष्टया चांगले व वाईट हे ठरवण्यासाठी सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करावा लागतो. " चांगले " मूल्य हे आपण कसे ठरवणार ? चांगले म्हणजे सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीच्या दृष्टीने योग्य ते चांगले होय. कारण समाजाच्या अपेक्षेनुसार जे वर्तन योग्य ते चांगले होय. त्यालाच आपण सामाजिक

मूल्ये या सदरात मोजतो. " वाईट " हे मूल्य सुध्दा परिस्थिती नुसार बदलत असते. वाईट हे सुध्दा त्या त्या सामाजिक परिस्थितीनुसार ठरत असते. उदा. भारतासारख्या देशात सार्वजनिक ठिकाणी स्वत:च्या स्त्रीचे देखिल चुंबन घेणे हे सामाजिक दृष्टीने अयोग्य वर्तन ठरते. तर प्रगत अशा पाश्चात्य देशात सार्वजनिक ठिकाणी परस्त्रीचे देखिल अभिवादनाच्या स्वरूपात चुंबन घेणे अयोग्य वर्तन मानले जात नाही.

सामाजिक मूल्ये ही व्यक्तीच्या बाहय वर्तनावरुन निरीक्षण करुन ठरविली जातात. बाहय वर्तनात कृती आलेली असते. त्यामुळे आपणास वर्तनाचे निरीक्षण करता येते. नैतिकदृष्टया व सामाजिक दृष्टया त्या व्यक्तीचे वर्तन योग्य आहे किंवा नाही हे सामाजिक व नैतिक मूल्यांच्या प्रमाणाद्वारे समाज ठरवत असतो.

साहित्यशास्त्रात " मूल्य " शब्द समाजकल्याण अथवा मानवाचे हित या व्यापक अर्थापर्यंत मर्यादित नाही. कित्येक वेळा साहित्याला वर्णन केलेले आचरण हे घटना, व्यक्ती अथवा नीति संमत असत नाहीत, तरी सुध्दा त्यांचे स्वत:चे असे मूल्य असते.[५] दुष्यंताचे शकुंतलेला सोडणे ही चांगली गोष्ट नाही. परंतु या घटनेमुळेच मूळ शकुंतलमध्ये करुण रस निर्माण होतो. देवता अथवा असुर, स्त्री अथवा पुरुष हे अमुक प्रकारे बाहयत: अनैतिक वाटणारे पापाचरण करतात. परंतु घटनांच्या व वर्णनाच्या विशेषतेनुसार तीच गोष्ट प्रेक्षकांच्या मनात त्याच क्षणी ते अनीतिमान नाही अथवा रूढार्थाने ते पाप नाही याचा विश्वास जागवते. इथेच शिव व सुंदरतेचे द्वंद्व सुरु होते जे सत्य, शिव व सुंदर या तिन्ही मूल्यांना एकाच सत्तेचे तीन पदर मानतात. तसेच सौंदर्यवादी सौंदर्याला अंतीम मूल्य मानतात. तर नीति प्रचारक"शिव"ला आणि वास्तववादी " सत्य " ला मानतात.

" मूल्य " ही एक कसोटी अथवा निकष आहे. ज्याच्या आधारे साहित्याची पारख केली जाते. मनुष्य हा प्रथम व्यक्ती आहे. त्याची स्वत:ची कांही मूल्ये असतात. परंतु मनुष्य अथवा व्यक्ती ही मोठया अशा समाज म्हणजे कुटुंब, नगर, प्रदेश, राज्य, विश्व यांचा एक घटक असते. त्यामुळे त्यांचे विचार,

कल्पना, कार्य इत्यादी दृष्टीने मूल्यांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.

" कौटुंबिक मूल्ये " ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व निर्मितीत साधक अथवा बाधक असू शकतात. ही मूल्ये त्याची साहित्यिक अभिरुची, शिक्षण, संस्कार इत्यादी निश्चित करतात. यातूनच एक विशिष्ठ प्रकारची मूल्य संहिता व्यक्ती तयार करते.

अशा मूल्यांचा संघर्ष कुटुंबापेक्षा विस्ताराने मोठया अशा नगर, समाज, राष्ट्र, जात, भाषा अशा अनेक प्रकारच्या गटाच्या अथवा संस्थेच्या मूल्यांशी होतो. यातूनच व्यक्तीचे व्यक्तित्व बनले जाते तर कधी बिघडले जाते. त्याचे साहित्यिक मूल्य सुध्दा त्या प्रमाणातच बनते, अगर बिघडते. या सर्व विविध मूल्यांच्या नंतर सुध्दा एक महत्वाचे मूल्य आहे. ते म्हणजे मानवीय मूल्य अथवा मानवता मूल्य होय. कारण हे मानवता मूल्य हेच साहित्यात विवेक वाढवण्याच्या दृष्टीने सहाय्यक असते.

" सामाजिक मूल्य " हे एका विशिष्ट प्रकारच्या अर्थशास्त्रीय, राजनैतिक दृष्टीने वापरले जाते. कारण शेक्सपिअर अथवा कालिदास यांच्या नाटकाचे सामाजिक मूल्य कमी आहे असे मानतात. तरीसुध्दा त्यामध्ये साहित्यिक मूल्य अधिक असल्याने त्यांना श्रेष्ठ साहित्यिक मानले जाते. थोडक्यात असे म्हणता येईल की, जी मूल्ये समाज मूल्यांच्या विरोधी न होता त्यांना पोषक असलेली व्यक्ती-मूल्येच असतात व तीच खरी मानवता मूल्ये सुध्दा असतात.

मूल्यांच्या विविध व्याख्यावरून मूल्यांचा संबंध व्यक्तीच्या आवडी, निवडी वृत्ती, त्याचे मानसिक स्वास्थ, समाजहित, त्याच्यातील विविध गुण इत्यादी बाबींशी आहे. हे सर्व घटक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाशी संबंधित असल्याने या वरुनच व्यक्तीचा समाजातील दर्जा ठरत असतो. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात मूल्यांना अनन्यसाधारण महत्व आहे.

व्यक्तीचे जीवन मूल्यांनी युक्त करावयाचे असेल तर म्हणजेच तिला गुणसंपन्न बनवावयाची असेल तर ही जबाबदारी प्रामुख्याने शिक्षणावर येते. कारण शिक्षणाद्वारेच विविध प्रकारची मूल्ये व्यक्तीमध्ये रुजवावी लागतात. ही मूल्ये व्यक्तीमध्ये शिक्षणा-

तून रूजवतांना त्यामध्ये मातृभाषेचा सिंहाचा वाटा असतो. कारण मातृभाषा हेच व्यक्तीचे ज्ञानग्रहणाचे प्रमुख साधन आहे. हे आपण प्रकरण १ मध्ये पाहिले आहे. ( पहा पृष्टांक ११, १२) त्यामुळे मूल्ये रूजवण्यामध्ये मातृभाषेच्या अध्यापनाला अनन्यसाधारण महत्व आहे. जीवनमूल्यांच्या स्वीकारामुळे व्यक्तीच्या जीवनास अर्थपूर्णता येते व हया जीवनमूल्यांचा स्वीकार प्रभावीपणे होण्यासाठी मातृभाषेचे अध्यापन प्रभावीपणे होण्याची गरज आहे. मातृभाषेचे अध्यापन प्रभावी करावयाचे म्हणजेच मातृभाषेचा पाठयांश, पाठांचा आशय प्रभावीपणे विद्यार्थ्यांत संक्रमित करावयाचा म्हणजेच विविध त-हेच्या मूल्यांचे प्रभावी अध्यापन करणे होय. त्यामुळे मूल्यांचे प्रभावी अध्यापन कसे करता येईल याचा विचार करणे अधिक उपयुक्त होईल.

## २.३ मूल्यांचे अध्यापन :

अध्ययन म्हणजे शिकणे व अध्यापन म्हणजे शिकविणे होय. अध्यापनाचा संबंध हा शिक्षकाशी असतो. त्यामुळे अध्यापन प्रभावी असले तरी अध्ययन प्रभावी होईलच असे नाही. अध्ययन व अध्यापन या प्रक्रियेलाच शिक्षण म्हटले जाते. व्यक्तीच्या वर्तनाला योग्य वळण लावण्याचे कार्य शिक्षण करते. शाळेमध्ये ठराविक अभ्यासक्रम नियुक्त केलेला असतो व तो अभ्यासक्रम प्रभावी अध्यापनाद्वारा विद्यार्थ्यांना शिकवला जातो व या द्वारेच व्यक्तीमध्ये अपेक्षित वर्तन बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. म्हणून व्यक्तीच्या वर्तनातील अपेक्षित बदल म्हणजे शिक्षण अशीही शिक्षणाची व्याख्या केली जाते.

शालेय अभ्यासक्रमातून मानवी जीवनमूल्यांचे शिक्षण दिले जाते. शिक्षण म्हणजेच इष्ट व सुयोग्य दिशेने घडवून आणलेला विकास. आपल्या सांस्कृतिकदृष्टया बहुविध असणा-या समाजात, सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पूर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

भाषा साहित्यात मानवी भाव भावना, सुख-दु:ख, व्यथा यांच्या कथा, तो मानव कोणत्याही देशातील असो सारख्याच असतात. त्यांच्या अभिव्यक्तीचे स्वरुप फारतर कमी अधिक प्रमाणात बदलेल. त्यामुळे साहित्य हे मानवा मानवा मध्ये जवळीकता निर्माण करण्याचे प्रभावी साधर आहे. भाषा विषयाच्या अध्यापनातून अनेक प्रकारची मानवी जीवनमूल्ये विकसित करता येतील. सुशिक्षित व सुसंस्कृत माणसाचे लक्षण म्हणजे रसिकता व रसिकतेचा आधार म्हणजे सौंदर्यदृष्टीचा विकास भाषाविषयाच्या अध्यापनातून अशी वृत्ती निर्माण झाली पाहिजे व ही करण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्याने आपणास मूल्याध्यापनाचा विचार करणे अगत्याचे आहे. म्हणजेच मूल्यांच्या अध्ययन अध्यापनाला अत्यंत महत्व आहे आणि म्हणून शिक्षण प्रक्रियेचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात विचार करतांना, " मूल्यांचे ज्ञान " हे शिक्षणाचे प्राथमिक कार्य सर्व स्तरावर असावे. मूल्य शिक्षणाचा अवलंब करण्याकरता मार्गदर्शनात्मक असे फारच थोडे साहित्य उपलब्ध आहे.

मूल्यांच्या अध्यापनासंबंधी विचार करतांना एक गोष्ट आपल्या प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे व्यक्तीला केवळ मूल्यांचे ज्ञान, माहिती असून चालत नाही, तर ही मूल्ये व्यक्तीच्या वर्णनातून प्रतिबिंबित झाली तरच तिने मूल्यांना स्वीकार केला व ती व्यक्ती मूल्यांनी युक्त आहे असे म्हणता येईल. कारण - "Values are not taught but caught", असे मूल्य अध्यापनाच्या संदर्भात म्हटले जाते. याचाच अर्थ मूल्यांच्या संदर्भात त्यांच्या कृतीस अधिक महत्व आहे हे आपल्या लक्षात येईल.

विविध पाठय घटकतून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संस्कार जेंव्हा शिक्षक अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांवर करुत असतो त्यावेळी त्यांना मूल्यांचे कितपत ज्ञान झाले हया पेक्षा त्यांच्यामध्ये मूल्ये किती प्रमाणात संक्रमित झाली ? ज्या मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर जाणीवपूर्वक केले गेले त्यांचा स्वीकार त्यांच्याकडून झाला कां ? व वर्तनामध्ये त्याचे प्रतिबिंबि पहावयास मिळते कां ? या बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यामुळे इतर विषय आध्यापन आणि मूल्य अध्यापन करतांना शिक्षकास प्रामुख्याने वरील बाबींची योग्य कल्पना, जाणीव असणे आवश्यक

आहे व ही जाणीव ठेवूनच त्याने मूल्यांचे अध्यापन करणे आवश्यक आहे. अन्यथा मूल्यशिक्षण हे ख-या अर्थाने मूल्य शिक्षण होणार नाही.

ज्ञान आकलनाच्या बाबत ज्या पध्दती आहेत त्या पध्दती व मूल्य आकलन करण्याच्या पध्दती यात फरक असला पाहिजे. जसे तत्वज्ञान हे चर्चेतून शिकवता येते. पण पोहणे शिकावयाचे असेल तर आपल्यास प्रवाहात पडल्याखेरीज शिकता येणार नाही. चित्रकला शिकणे, संगीत शिकणे यांच्या पध्दतीही भिन्न भिन्न पाहिजेत, आणि म्हणूनच मूल्य शिक्षणाबाबत अध्यापन पध्दती सूचवतांना अत्यंत जागरुक व सतर्कतेने अत्यंत योग्य अशी मूल्य शिक्षणपध्दती निवडावी लागेल. मूल्यांसंबंधी शिक्षण हे कृतितून मोजतात म्हणजेच विद्यार्थी काय शिकला हे एवढेच महत्वाचे नसून तो कितपत कृतीत उतरवतो याला महत्व आहे. मूल्यावर आधारित शिक्षण घेतलेला काय करतो म्हणजे त्याच्या वर्तनाचे मूल्यमापन आवश्यक असते.

कोणत्याही शिक्षणामध्ये तीन गोष्टींचा संबंध येतो. मूल्य शिक्षणामध्येही त्या येतात, या गोष्टी म्हणजे, (१) शिक्षक, (२) विद्यार्थी, (३) समाज चांगल्या अध्यापनात पाठयांश, शिक्षकाने पुरविलेले दाखले आणि अध्यापन पध्दती हे चांगल्या मूल्य शिक्षणाच्या अध्यापनाचे प्रमुख आवश्यक भाग आहेत. विद्यार्थ्यांची आकलन करण्याची क्षमता, त्यांची प्रवृत्ती या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या आहेत. कुटुंब व सामाजिक वातावरण यावर विद्यार्थ्यांना मूल्य स्वीकृतीसाठी उद्युक्त करण्याची क्षमता अवलंबून असते. व यामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया घडून येते. थोडक्यात म्हणजे मूल्यशिक्षणासाठी अनुकूल सामाजिक व सांस्कृतिक वातावरण, आदर्श शिक्षक व परिवर्तनशील विद्यार्थी या आवश्यक गोष्टी आहेत. म्हणजेच शिक्षणाने विद्यार्थ्यांना मूल्यांच्या बाबतीत केवळ बौध्दिक दृष्टया संचित करुन भागणार नाही. तर त्यांच्या वृत्तीत इष्ट ते परिवर्तन घडवून आणले पाहिजे. थोडक्यात मूल्ये रुजविणे व त्यांचे संवर्धन करणे ही प्रक्रिया शिक्षणाने व्यक्तीच्या ज्ञानात्मक भावात्मक व क्रियात्मक अशा तिन्ही क्षेत्रात घडवून आणली पाहिजे. यासाठी अध्यापन करतांना अथवा विविध उपक्रम शैक्षणिक संस्थातून राबवतांना ते उपक्रम कां राबवावयाचे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना करुन दिले पाहिजे. तसेच त्या

द्वारे विद्यार्थ्यांमध्ये नेमकी कोणती मूल्ये रूजवावयाची आहेत याची निश्चिती पाहिजे. म्हणजेच त्यांना उपक्रमांचे मर्म समजले पाहिजे. व ते समजले तर तो अशा उपक्रमात अंत:करणापासून हृदय ओतून सहभागी होऊन ते उपक्रम यशस्वी करू शकेल. मर्म न जाणता पार पडले अथवा पाडले जाणारे उपक्रम म्हणजे मंत्र हरवलेल्या तंत्र स्वरूपातील कर्मकांडाप्रमाणे होते. त्यामुळे ते कर्म पार पाडल्याचे समाधान लाभले तरी हे समाधान फसवे असते व त्यातून खरेखुरे लाभ मिळतीलच असे नाही. आणि म्हणून मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शाळांची पर्यायाने शिक्षकांची जबाबदारी वाढते. कारण ही विविध त-हेची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये कशी संक्रमित केली पाहिजेत याचे यथार्थ ज्ञान शिक्षकास असणे आवश्यक आहे.

मूल्य शिक्षण अधिक प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी मूल लहान असते तोपर्यंत त्याला इष्ट वळण लावण्याचा प्रयत्न अधिक लवकर यशस्वी होतो. म्हणून त्याच्या लहान वयापासूनच इष्ट वळण लावणे आवश्यक असते. बालकावर त्याच्या कुटुंबातील, परिसरातील, सर्वव्यवहाराचे प्रत्येक क्षणी संस्कार होत असतात. त्या करता मुलावर संस्काराची सतत धार राहील इकडे कुटुंब प्रमुख व शिक्षक यांनी लक्ष दिले पाहिजे. तसेच मुलांना योग्य वळण लावण्याच्या संदर्भात त्याच्या सहज-प्रवृत्ती ध्यानात घेणे आवश्यक आहे. या सहजप्रवृत्तींचा लाभ मूल्यसंवर्धनासाठी कसा करून द्यावा याचाही शिक्षकाचा अभ्यास असला पाहिजे.

कौतुकपूर्ण उद्‌गारांना विद्यार्थी भरघोस प्रतिसाद देतो. त्यामुळे मूल्य रूजवण्यास याचाही उपयोग होवू शकतो.

मुलांची प्रवृत्ती गटवार काम करण्याची असते. मुलामुलांत सुरवातीला सहकार्य वृत्ती वाढविण्यास या प्रवृत्तीचा भरपूर उपयोग करून घेता येतो.

मुलांना आज्ञा देतांना त्या नकारार्थी असू नयेत. उदा. हे करू नका, ते करू नका असे सांगतात. पण नेमके काय करा ते सांगीतले जात नाही. त्यामुळे आज्ञा होकारार्थी हव्यात.

मुलांना वळण लावण्याचा म्हणजेच त्यांच्यामध्ये मूल्ये रूजवण्याचा प्रयत्न समजूतीने, संस्काराने शिक्षणाने करावयाचा असतो, शिक्षेने नव्हे. ज्या मूल्यांचे संवर्धन आपण बालक, किशोर, कुमार व तरूण यांचेमध्ये करू इच्छितो त्या मूल्यांनुसार आपण तसे वागण्यास सांगतो, म्हणून ते वागतील ही पण हे केवळ अनुभव, कोवळेवय आपल्यावरील विश्वास यामुळे घडेल. पण पुढे त्यांची विचार करण्याची शक्ती काम करू लागली म्हणजे असेच का वागायचे ? असेच कां करावयाचे? असे प्रश्न त्यांना पडू लागतील अशावेळी आपल्यावरील विश्वास त्यांना नैतिक मूल्यवर्तनावर स्थिर ठेवण्यास अपुरा पडेल. पण तो स्वत: विवेकशक्तीचा उपयोग करून शिक्षकांनी सुचविलेले, सांगीतलेले मूल्य वर्तन योग्य आहे या निर्णयाला स्वत:च्या विवेकशक्तीचा उपयोग करून आपणहून आला पाहिजे. अशी आपली मूल्य शिक्षणाची अध्यापन पद्धती हवी.

बुद्धिवाद्यांना एखादी गोष्ट बौद्धिकरित्या पटली तरी त्या मूल्यानुसार ते वागतातच असे नाही. सर्व बुद्धिवादी बुद्धिनिष्ठ नसतात.[६] याचाच अर्थ बुद्धिला जे पटेल तसे ते वागतातच असे नाही. म्हणून विद्यार्थी बुद्धिनिष्ठ होण्याकरता धैर्य, साहस, निर्भयता, त्याग आदी गुणांची जोड असावी लागते. तेंव्हा मूल्य शिक्षण देत असताना अशी कांही मौलिक गुणांचे संवर्धन सहज होईल इकडेही शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

मूल्य शिक्षणासाठी अधिकाराचा वापर शिक्षकानी करू नये कारण त्यामुळे विद्यार्थी धाकामुळे अथवा अधिकारामुळे मूल्यस्विकृती घडते पण हे वागणे नकारात्मक असते. अंत:प्रेरणेने इतरांच्या ब-या करता, आनंदा करता वागणे घडत नाही. तर तसे वागणे अधिक उच्च दर्जाचे असते. ती उच्च दर्जाची नीतिमत्ता असते व असे वागणे अधिकाधिक विद्यार्थ्यांकडून घडण्यासाठी मूल्य शिक्षण देतांना अधिकाराचा वापर करू नये.

विद्यार्थ्यांचे मूल्य शिक्षण अधिक प्रभावी होण्यासाठी विद्यार्थ्यांची विवेकशक्ती जागृत केली पाहिजे, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या बोलण्या, वागण्याच्या

वेळी आपल्या सद्सद्विवेक बुध्दीचा कौल मागावा, अशी सवय लावली पाहिजे व मूल्यशिक्षण देतांना हेच धोरण शिक्षकांनी अवलंबिले पाहिजे.

विद्यार्थ्यांना मनन, चिंतनाची सवय लावली पाहिजे. चिंतनाने व अनुभवाने वृत्ती पालटते. चिंतनाने ग्रहण केलेली मूल्ये दृढ होतात. त्यामुळे विद्यार्थी मूल्यांनी युक्त बनतो.

मूल्यशिक्षण प्रभावी होण्यासाठी मूल्यांचे अध्यापन करतांना आपले अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी अध्यापकांनी पाठनियोजन अत्यंत काळजीपूर्वक केले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षणाकरिता संधी मिळेल अशा प्रकारची परिस्थिती, सोयी व साहित्य पुरविले पाहिजे. मूल्यांचे आरोपन करण्यासाठी मूल्य रुजवण्यास उपयुक्त ठरणा-या पाठांतील विशिष्ट भागाकडे खास लक्ष पुरविले पाहिजे. तसेच शाळेत आयोजित करण्यात येणारे विविध उपक्रम हे मुख्यत: मूल्य शिक्षणावर आधारितच असावेत. तसेच मूल्ये कोणत्या मार्गाने शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोचवितो हे ही महत्वाचे आहे. नुसते मूल्यांबाबत कथन करण्यापेक्षा छोटया गोष्टी, उदाहरणे, प्रसंगरुपाने अथवा दृक श्राव्य साधनांच्या मदतीने हे कार्य करता आले तर ते अधिक परिणामकारक होईल.

अभ्यासक्रम अथवा अध्यापन पध्दती पेक्षाही शिक्षकाची नीतियुक्त वर्तणूक ही सर्वात अधिक महत्वाची ठरते. जर शिक्षक प्रत्यक्षात वाईट वर्तणूकीचा, मूल्ये ढासळलेला असेल तर अशा शिक्षकांने कितीही चांगल्याप्रकारे प्रभावी अध्यापन केले तरी ते व्यर्थ आहे. कारण त्याच्या वर्तणूकीचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असतो. या उलट शिक्षकाची उच्च त-हेची वर्तणूक त्याचे शील हे जीवनाची उच्च मूल्ये समजण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक प्रेरित करतील. याच बरोबर कुटुंब, समवयस्क गट, समाज यांचा ही विद्यार्थ्यात मूल्ये रुजविण्यात फार मोठा वाटा आहे.

मूल्याचा अंतर्भाव औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही शिक्षणात झाला पाहिजे. विविध दृक श्राव्य साधने उदा. आकाशवाणी, दूरदर्शन यांचाही

मूल्य शिक्षणाकरिता उपयोग केला गेला पाहिजे. तसेच औपचारिक व अनौपचारिक संस्थामधून चारित्र्य घडवण्याकरता विशिष्ट कार्यक्रम आखले गेले पाहिजेत.

शिक्षकाने आपल्या प्रभावी अध्यापनाद्वारे मूल्य संस्कार केले तरी मूल्यांचा स्वीकार विद्यार्थ्यांकडून होणे गरजेचे असल्याने मूल्याचे अध्यापन करतांना ते ऐतिहासिक, पौराणिक कथा, लोककथा, सुभाषिते, म्हणी इत्यादी विविध उदाहरणे , दाखले, प्रसंग यांच्या सहाय्याने मूल्यांचे अध्यापन करणे आवश्यक आहे. कारण मूल्यास्विकृतीनंतर व्यक्तीचे वर्तन कसे असते ? तिच्या वर्तनात नेमका कोणता बदल होतो. याचे दृश्य रूप कथांच्या उदाहरणांच्या साहयाने विद्यार्थ्यांसमोर उभे करता येते. मूल्य शिक्षणाच्या दृष्टीने " आदर्श " म्हणजे नेमके कसे ? याची स्पष्ट कल्पना, जाणीव, उदाहरणे, दाखले, कथा यांच्या साहयाने देता येतात.

## २.४ समारोप :

प्रस्तुत प्रकरणात मूल्य म्हणजे काय ? त्याचा अर्थ, महत्व आणि मूल्यांचे अध्ययन , अध्यापन या बाबींचा उहापोह केलेला आहे. या प्रकरणाचा प्रस्तुत संशोधनास पार्श्वभूमी सारखा उपयोग होणार आहे.

पुढील प्रकरणामध्ये मूल्य शिक्षणाचे संदर्भात कोणकोणती संशोधने झालेली आहेत याचा चिकित्सात्मक आढावा घेतलेला आहे.

=0=0=0=0=0=

संदर्भ :

१. जोशी, लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोष खंड १३,
(मुंबई : महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळ, १९८७) प्र.आ. पा.नं.८८९.

२. जोशी लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोष खंड १३,
(मुंबई : महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळ,१९८७) पा.नं.८९०.

३. सहस्त्रबुध्दे दि.ह : शिक्षणातून नैतिक मूल्य संवर्धन,
(पुणे : साधना प्रकाशन, प्र.आ.१९८४) पान नं.२७

४. एन.सी.ई.आर.टी. : व्हॅल्यूज अॅन्ड स्कूल,
(नवी दिल्ली ÷ एन.सी.ई. आर.टी. प्रकाशन वर्ष दिलेले नाही)पा.नं.१

५. धीरेंद्र वर्मा, व्रजेश्वर वर्मा, धर्मवीर भारती, रामस्वरुप चतुर्वेदी, रघुवंश : हिंदी साहित्य कोष भाग-१,
(वाराणसी : ज्ञानमंडळ लि.,वसंत पंचमी संवत २०२०,द्वि.आ.)पा.नं.६५४.

६. सहस्त्रबुध्दे, दि.ह. : शिक्षणातून नैतिक मूल्य संवर्धन,
(पुणे : साधना प्रकाशन, प्र.आ.१९८४) पान नं.५३,५४.